Rediffusion/Edelman

Coverage Report: TCS IT Wiz – Mumbai Edition

**Publication:** Saamna
**Date:** 12/11/14
**Edition:** Mumbai
**Page No:** 9
**Headline:** Tata Consultancy ‘TCS IT Wiz’ quiz

# टाटा कन्सलटन्सीची ‘टीसीएस आयटी विझ स्पर्धा’

## विद्यार्थ्यांसाठी माहिती-तंत्रज्ञानावर प्रश्नमंजुषा

मुंबई, दि. ११ (प्रतिनिधी) - शालेय विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना देण्यासाठी टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेसने (टीसीएस) टीसीएस आयटी विझ २०१४ या स्पर्धेची घोषणा केली आहे. १६ नोव्हेंबरला वांद्रे येथील इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या माणिक सभागृहात ही स्पर्धा होणार आहे.

आठवी ते बारावीपर्यंतचे विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश शुल्क नसून एक शाळा दोन विद्यार्थ्यांचा समावेश असलेले दहा संघ पाठवू शकतात. विद्यार्थ्यांची लेखी प्राथमिक परीक्षा घेण्यात येईल. या परीक्षेत यशस्वी झालेल्या पहिल्या सहा संघांना विभागीय अंतिम फेरीत सहभागी होता येईल. सर्वोत्कृष्ट संघाला अंतिम फेरीत प्रवेश दिला जाणार असून विजेत्या संघाला डिसेंबरमध्ये सिंगापूर आणि यूएईमध्ये होणाऱ्या महाअंतिम फेरीत सहभागी होता येईल. स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांना शिक्षण, मनोरंजन, पुस्तके, मल्टीमीडिया, संगीत, सिनेमा, इंटरनेट, बँकिंग, जाहीरात, खेळ, सेल फोन्स, ब्लॉगिंग या क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञानाशी निगडित प्रश्न विचारण्यात येतील.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शाळांनी आपल्या प्रवेशिका १४ नोव्हेंबरपर्यंत शामला पद्मनाभन किंवा मनीषा शेट्टी यांच्याकडे टीसीएस हाऊस, रॅव्हेलीन स्ट्रीट, २१ डी. एस. मार्ग, फोर्ट या पत्त्यावर पाठवाव्यात. संपर्क - ०२२ - ६७७८९०८०/९०८१ शिवाय www.tcsitwiz.com या वेबसाइटवर ऑनलाइन रजिस्ट्रेशन करता येईल.